# मराठी भाषा दिवस

“माझ्या मराठीची थोरी, नित्य नवे रुप दावी,

अवनत होई माथा, मुखी उमटते ओवी!!”

२७ फेब्रुवारी हा दिवस थोर ज्येष्ठ मराठी साहित्यिक, नाटककार श्री विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आणि त्यामुळेच हा दिवस आपण ‘मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा करतो. मराठी ही आपली मायबोली, मराठी ही आपल्या महाराष्ट्राची भाषा. आपल्या मराठी भाषेचा मान राखून आपण आपल्या शाळेतही 'मराठी भाषा दिवस' मोठ्या जल्लोषाने व उत्साहाने साजरा करतो. या वर्षीही हा दिवस आपण सर्वांनी तितक्याच उत्साहाने पण ऑनलाइन पद्धतीने साजरा केला.

या कार्यक्रमाची सुरुवात सिस्टर आरोकिया, फादर फेलिक्स व इतर गुरुजनांच्या ज्योत प्रज्वलनाने व पसायदानाने झाली. फादर फेलिक्स यांनी त्यांच्या भाषणात मराठी भाषेबद्दल थोडीशी माहिती सांगितली व त्यानंतर सर्व शिक्षकांनी एकत्र येऊन देवाकडे सगळ्यांच्या सुखासाठी व निरोगी दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता. गोष्टी, गीते, नृत्य, एकांकिका, पोवाडे असे खूप छान छान आणि विविधरंगी कार्यक्रम मुलांनी सादर केले. मी स्वतः श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकपात्री प्रयोग सादर केला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांचे सादरीकरण झाल्यानंतर आम्हाला मराठी संस्कृती बद्दल माहिती देणारी एक चित्रफीत दाखविण्यात आली. त्यामध्ये आपल्या महाराष्ट्राला लाभलेले अनेक महान संत, महात्मे, थोर साहित्यिक, लेखक, नाटककार, मराठी खेळ, मराठी महिने, मराठी पेहरावा, मराठी खाद्यसंस्कृती अशा अनेक गोष्टींचा समावेश होता. कार्यक्रमाची सांगता “आज साजरा करू मराठी राजभाषा दिन” या कवितेचे वाचन करून करण्यात आली.

शौर्य पाटील,

८वी,ब.